(मनपाकडे अर्ज करावयाचा विहीत नमूना)

दिनांक:-

प्रति,
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**विषय** :-नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे --------- ------ शिवारातील स.नं.------------------ भु.क्र.---------------- येथील बांधकामास नाहरकत दाखला मिळणेबाबत ...

**संदर्भ** : १) मा.शासन निर्णय जा.क्र. DMU/२०२०/CR-९२/DISM-१ दि.१७/०४/२०२०
२) नगररचना विभागाकडील बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक

महोदय,

नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे --------- ------ शिवारातील स.नं.------------------ भु.क्र.---- ------------ येथील बांधकामाचे नकाशास उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये बांधकाम परवानगी प्राप्त झाली आहे. परंतु दिनांक २३/३/२०२० पासुन मा.शासनाच्या आदेशानुसार करोना (कोव्हीड-१९) व्हायरसचा प्रसार रोखनेसाठी विषयांकीत जागेवरील बांधकाम बंद ठेवण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाने दि.१७/४/२०२० रोजीच्या आदेशान्वये मार्गदर्शक तत्वे लागु केली आहे. सदर आदेशातील कलम १६ मधील बाब क्र. ३ नुसार महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम प्रकल्प चालु करणेबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यानुसार ज्या बांधकाम प्रकल्पावर काम करणारे कामगार त्याच जागी उपलब्ध असतील आणि बाहेरुन कामगार आणण्याची आवश्यकता नसेल अशी कामे कार्यन्वित करणेबाबत सुचित केले आहे. त्यानुसार विषयांकीत जागेत संदर्भ क्र. २ नुसार प्राप्त झालेल्या बांधकाम परवानगीचे अधिन राहुन बांधकाम पुन:श्च सुरु करणेस परवानगी मिळणेकामी सदरचा विनंती अर्ज करीत आहोत.

शासन निर्णयानुसार कामाचे जागी राहणा-या कामगारांना निवारा, अन्न, पाणी, जीवन आवश्यक वस्तु, आरोग्य विषयक आवश्यक उपाय योजना, नोंदनी क्रमांक असलेले ओळखपत्रे इत्यादी आवश्यक बाबी पुरविणेची सर्वस्वी जबाबदारी आम्ही घेण्यास तयार आहोत. सदर जागेवरील कामगार हे मास्क् लावून काम करतील, ५ पेक्षा जास्त व्यक्ती एका ठिकाणी थांबणार नाहीत व दोन व्यक्तीमधील भौतीक अंतर हे १ मीटर पेक्षा जास्त राहिल याची आम्ही दक्षता घेऊ. तसेच सदर कामाचे जागी बाहेरील कामगार येणार नाहीत तसेच कामाचे जागेवरील कामगार बाहेर जाणार नाही, याचीदेखील खबरदारी आम्ही घेण्यास तयार आहोत. शासनाच्या सर्व अटी/शर्तीचे पालन करण्यास आम्ही तयार आहोत.

तरी उपरोक्त संदर्भिय आदेशाच्या अधिन राहुन बांधकाम सुरु करणेस नाहरकत मिळाला ही विनंती.

आपला विश्वासु

--सही --
(अर्जदाराचे नाव)
आर्किटेक्ट् / बांधकाम व्यवसायीक
मोबाईल क्र.-
इ-मेल –
व्हॉटसअॅप मो.क्र.-

**सोबत** –

१) इमारत बांधकाम परवानगीची छायांकीत प्रत.
२) कामगारांची नावे, वय व इतर तपशीलाची यादी

दिनांक-२०/०४/२०२०

# <u>प्रेस नोट</u>

**विषय -:** नाशिक महानगरपालिका हद्दीतील बांधकामास नाहरकत दाखला देणेबाबत…

Covid-१९ या जागतीक महामारीमुळे केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांनी घेतलेल्या लॉकडाऊनच्या निर्णयामुळे दि. २२/३/२०२० पासुन नाशिक शहरात सुरु असलेले इमारत बांधकामे बंद ठेवण्यात आलेली आहेत.

मा. गृहमंत्रालय, भारत सरकार यांचा शासन निर्णय क्र. ४०-३/२०२०-DM-I (A) दि. १५/४/२०२० अन्वये दि. २०/४/२०२० पासुन लॉकडाऊनच्या काळातील आदेशीत केलेल्या गाईड लाईनचा अवलंब करुन काही कामे सुरु करता येतील .त्यानुसार महाराष्ट्र शासनाने आदेश क्र. DMU/२०२०/CR-९२/DISM-१ दि.१७/०४/२०२० अन्वये ही मनपा हद्दीतील बांधकामे काही अटी-शर्तीवर सुरु करण्यास अनुज्ञेय केले आहे.

उपरोक्त बाबत मा. जिल्हाधिकारी सो. यांचेकडील दि.१९/४/२०२० रोजीचे आदेशानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रात दि.२०/४/२०२० पासुन सुरु करावयाच्या बांधकामांना नाहरकत दाखला नाशिक महानगपालिकेमार्फत दयावयाचा आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार दयावयाचा बांधकाम नाहरकत दाखला हा कन्टेंनमेंट झोन करीता देता येणार नाही. शासन निर्णयानुसार कामाचे जागी राहणा-या कामगारांना निवारा, अन्न, पाणी, जीवन आवश्यक वस्तु, आरोग्य विषयक आवश्यक उपाय योजना, नोंदणी क्रमांक असलेले ओळखपत्रे इत्यादी आवश्यक बाबी पुरविणेची सर्वस्वी जबाबदारी विकासकाची राहील. तसेच जागेवरील कामगार हे मास्क् लावून काम करतील, ५ पेक्षा जास्त व्यक्ती एका ठिकाणी थांबणार नाहीत व दोन व्यक्तीमधील भौतीक अंतर हे १ मीटर पेक्षा जास्त राहिल याची दक्षता घेणे आवश्यक राहील. तसेच सदर कामाचे जागी बाहेरील कामगार येणार नाहीत तसेच कामाचे जागेवरील कामगार बाहेर जाणार नाही,

याबाबत जमिन मालक / विकासक यांनी मनपाकडे करावयाचे विहित अर्जाचा नमूना मनपा संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याबाबत संबंधितांना नगरनियोजन विभागाचे कार्यकारी अभियंता यांचा **<u>इ-मेल-ee_tp@nmc.gov.in</u>** तसेच **<u>व्हाटसअप मो.क्र.९४२३१७९१८८</u>** हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

# कामाच्या जागी असलेल्या बांधकाम कामगारांचे विवरण पत्र

| अ.क्र. | कामगारांचे नाव | नोंदणी क्र. | वय | दुरध्वनी क्र. | सध्याचा पत्ता | कायम स्वरुपी निवासाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |